19 NOV 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विद्यापीठांनी तत्पर राहावे

## मृणालिनी फडणवीस : शिवाजी विद्यापीठाचा ५९वा वर्धापनदिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : संवाद, सृजनशीलता, सहकार्य या त्रिसूत्रीचा अवलंब करून शिक्षणक्षेत्रांला भेडसावणाऱ्या समस्त मर्यादांवर मात करण्याच्या दिशेने विद्यापीठांना वाटचाल करावी लागणार आहे. एकमेकांसमवेत सहकार्य, साहचर्याची भूमिका घेऊन देशाच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये वाटा उचलण्यासाठी विद्यापीठांनी तत्पर राहावे, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी गुरुवारी येथे केले.



कोल्हापुरात गुरुवारी शिवाजी विद्यापीठाच्या ५९व्या वर्धापनदिन कार्यक्रमाच्या प्रारंभी सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. यावेळी शेजारी कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के, आर. व्ही. गुरव, आर. के. कामत उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या ५९व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के होते. यावेळी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक पुरस्कारांने वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. एस.एस. महाजन यांना सन्मानित करण्यात आले. बॅरिस्टर पी.जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे यांना, तर प्राचार्य श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार कासेगाव (जि. सांगली) येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या डॉ. तेजस्विनी दीपक पाटील-डांगे यांना प्रदान करण्यात आला. शिक्षणाच्या संदर्भात दर्जावृद्धी शालेय स्तरापासूनच अभिप्रेत आहे. या बाबींचा दिशानिर्देश करण्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे. निसर्ग व पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी शिक्षण क्षेत्राने घ्यायला हवी, असे आवाहन कुलगुरु डॉ. फडणवीस यांनी केले. शिक्षक, कर्मचाऱ्यांनी नवतंत्रज्ञानाचा अवलंब करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठात विविध सेवांचे ऑटोमेशन करण्याचा प्रकल्प हाती घेतला असल्याचे कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सांगितले. प्र-कुलगुरु डॉ. पी.एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले.

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत व पसायदान सादर केले. नंदिनी पाटील, सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

### शिवाजी विद्यापीठाची प्रगती नेत्रदीपक

शंभर वर्षांहून अधिक काळाचा वारसा असलेल्या विद्यापीठांच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठाने अवघ्या ५९ वर्षांत साधलेली प्रगती नेत्रदीपक आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाने सामाजिक दायित्वाच्या भावनेतून राबविलेले उपक्रमसुद्धा अनुकरणीय स्वरूपाचे आहेत. अशा कामगिरीमुळे विद्यापीठाशी निगडित सर्वच घटकांमध्ये उत्तम काम करण्याची प्रेरणा निर्माण झाल्याचे डॉ. फडणवीस यांनी सांगितले.

19 NOV 2021
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची प्रगती नेत्रदीपक : डॉ. फडणवीस

## विद्यापीठाचा ५९ वा वर्धापनदिन उत्साहात : एस. एस. महाजन, अनिलकुमार वावरे, तेजस्विनी डांगे पुरस्काराने सन्मानित

कोल्हापूर : प्रतिनिधी

**शंभर वर्षांहून अधिक काळाचा वारसा असलेल्या विद्यापीठांच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठाने अवघ्या ५९ वर्षांत साधलेली प्रगती नेत्रदीपक आहे, असे गौरवोद्गार सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी गुरुवारी (दि.१८) काढले.**



कोल्हापूर : वर्धापनदिन समारंभात बोलताना सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू मृणालिनी फडणवीस. व्यासपीठावर प्र-कुलगुरू पी. एस. पाटील, कुलगुरू डी. टी. शिर्के.

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापनदिन समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. फडणवीस म्हणाल्या, शिवाजी विद्यापीठाने 'नॅक'च्या 'अ++' मानांकनासह देश-विदेशातील शैक्षणिक व संशोधकीय स्वरूपाचे अनेक टप्पे आणि शिखरे सर केली आहेत. अवघ्या साठ वर्षांच्या वाटचालीत विद्यापीठाची ही कामगिरी गौरवास्पद आहे. तसेच विद्यापीठाने सामाजिक दायित्वाच्या भावनेतून राबवलेले उपक्रमसुद्धा अनुकरणीय स्वरूपाचे आहेत. अशा कामगिरीमुळे विद्यापीठाशी निगडित सर्वच घटकांमध्ये उत्तम काम करण्याची प्रेरणा निर्माण झालेली असल्याचे दिसते.

कार्यक्रमात विद्यापीठातील गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. महाजन यांना देण्यात आला. बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे यांना, तर कै. प्राचार्य श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार कासेगाव (जि. सांगली) येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या डॉ. तेजस्विनी दीपक पाटील-डांगे यांना प्रदान करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, सध्या माहिती तंत्रज्ञान व तत्संबंधी संशोधन विकासाच्या बळावर 'इंडस्ट्री-४.०' खूप वेगाने विस्तार पावत आहे. या इंडस्ट्रीमध्ये काम करावयाचे आणि टिकून राहावयाचे असल्यास त्याला माहिती संवाद तंत्रज्ञानाच्या अंगीकाराखेरीज पर्याय नाही. काही सेवा कार्यान्वितही झाल्या आहेत. यावेळी 'नॅक'चे 'अ' मानांकन मिळवणाऱ्या दि न्यू कॉलेज, कोल्हापूर आणि भोगावती महाविद्यालय, कुरुकली या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला.

### वनस्पतीशास्त्र व अर्थशास्त्र अधिविभागांना पुरस्कार

शिवाजी विद्यापीठाने २०१९ पासून उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार देण्यास सुरुवात केली. यंदा उत्कृष्ट अधिविभागासाठीचा हा पुरस्कार विज्ञान व तंत्रज्ञान गटात वनस्पतीशास्त्र अधिविभागाला, तर अन्य अधिविभागातून अर्थशास्त्र अधिविभागाला देण्यात आला. कुलगुरू डॉ. फडणवीस यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले.

19 NOV 2021 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरात गुरुवारी शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापनदिनी गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार वितरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. त्यात डावीकडून एस. एस. महाजन, स्वाती खराडे, फिरोज नायकवडी, अजय आयरेकर, बबन चौगुले. मोहन राजमाने, ज्ञानदेव तळुले (अर्थशास्त्र विभाग), तेजस्विनी पाटील-डांगे, रमेश कुंभार, जयंतराव कदम, विजयकुमार लाड, अनिलकुमार वावरे, व्ही. एस. राठोड यांना सन्मानित करण्यात आले. (छाया : नसीर अत्तार)

# विद्यापीठाच्या वर्धापनदिनी गुणवंत शिक्षक, कर्मचाऱ्यांचा गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापनदिनी गुरूवारी विद्यापीठ, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांच्या गुणवंत पाल्यांना विद्यापीठ प्रशासकीय, कल्याण निधी पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावर्षी उत्कृष्ट अधिविभागासाठीचा पुरस्कार विज्ञान व तंत्रज्ञान गटात वनस्पतीशास्त्र अधिविभागाला, तर अन्य अधिविभागांतून अर्थशास्त्र अधिविभागाला देण्यात आला. दहा लाख रुपये, प्रमाणपत्र आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या वर्धापनदिन कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यापीठाच्या प्रांगणात प्रमुख पाहुण्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते शिवपुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. त्यानंतर स्वाती खराडे, फिरोज नायकवडी, अजय आयरेकर, बबन चौगले (विद्यापीठातील गुणवंत सेवक), डॉ. मोहन राजमाने, डॉ. रमेश कुंभार (संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य), जयंतराव कदम, विजयकुमार लाड (गुणवंत सेवक) यांना प्रमुख उपस्थितांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता विद्यार्थी सौरभ पाटील आणि कुलपती सुवर्णपदक विजेती विद्यार्थिनी महेश्वरी गोळे यांचा आणि 'नॅक'चे 'अ' मानांकन मिळविणाऱ्या न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील आणि भोगावती महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य आर. एन. सरनोबत यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, आयक्यूएसी संचालक डॉ. एम. एस. देशमुख, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते.



19 NOV 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाने अल्पावधित साधलेली प्रगती नेत्रदीपक

## डॉ. मृणालिनी फडणवीस यांचे गौरवोद्गार; विद्यापीठाचा ५९ वा वर्धापन दिन उत्साहात






कोल्हापूर : १) शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापन दिन समारंभात बोलताना प्रमुख पाहुण्या व सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. २) डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते विद्यापीठातील गुणवंत शिक्षक पुरस्कार स्वीकारताना प्रा. डॉ. एस. एस. महाजन. शेजारी मान्यवर.
(छाया : पप्पू अत्तार)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शंभर वर्षांहून अधिक काळाचा वारसा असलेल्या विद्यापीठांच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठाने ५९ वर्षांत साधलेली प्रगती नेत्रदीपक आहे, असे गौरवोद्गार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी काढले.

विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापन दिन समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. याप्रसंगी विद्यापीठातील, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांची गुणवंत पाल्ये यांचा विद्यापीठ प्रशासकीय व कल्याण निधी पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कार प्राप्त प्रशासकीय विभाग, अधिविभाग यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. 'नॅक'चे 'अ' मानांकन मिळविणाऱ्या न्यू कॉलेज व भोगावती महाविद्यालय, कुरुकली या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला.

कुलगुरू डॉ. फडणवीस म्हणाल्या, विद्यापीठाने 'नॅक'च्या मानांकनासह देश-विदेशांतील शैक्षणिक व संशोधकीय स्वरुपाचे अनेक टप्पे व शिखरे सर केली आहेत. सामाजिक दायित्वाच्या भावनेतून राबविलेले उपक्रमसुद्धा अनुकरणीय स्वरुपाचे आहेत. अशा कामगिरीमुळे विद्यापीठाशी निगडित सर्वच घटकांमध्ये उत्तम काम करण्याची प्रेरणा निर्माण झाली आहे. उच्चशिक्षण क्षेत्रात कार्यरत लोकांनी विशेषतः शिक्षकांनी उच्च शैक्षणिक वारसा वृद्धिंगत करण्याची जबाबदारी स्वीकारायला हवी. विद्यार्थ्यांचा कल, आवड समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यात पालकांसह शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. कोव्हिड कालखंडाने विद्यार्थ्यांमधील बुद्ध्यांक, भावनांक याबरोबरच आध्यात्मांक विकसनाकडे लक्ष द्यायला हवे. शिक्षणासंदर्भात दर्जावृद्धी महत्त्वाची असून, शालेय स्तरापासूनच अभिप्रेत आहे. याचा दिशानिर्देश करण्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे. संवाद, सृजनशीलता व सहकार्य या त्रिसूत्रीचा अवलंब करून शिक्षण क्षेत्राला भेडसावणाऱ्या समस्त मर्यादांवर मात करण्याच्या दिशेने वाटचाल करावी लागणार आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सध्या माहिती तंत्रज्ञान व तत्संबंधी संशोधन विकासाच्या बळावर 'इंडस्ट्री-४.०' वेगाने विस्तार पावत आहे. इंडस्ट्रीत काम करावयाचे व टिकून राहावयाचे असल्यास त्याला माहिती संवाद तंत्रज्ञानाच्या अंगिकाराखेरीज पर्याय नाही. विविध क्षेत्रांत कार्यरत कर्मचाऱ्यांनी नवतंत्रज्ञानाचा अवलंब करणे गरजेचे आहे. त्यातून रोजगारास पूरक मनुष्यबळ निर्माण होईल. त्या दृष्टीने विद्यापीठात विविध सेवांचे ऑटोमेशन करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. नंदिनी पाटील, सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

तत्पूर्वी, विद्यापीठाच्या प्रांगणात डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, आर. के. कामत, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. नमिता खोत, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते.

### गुणवंतांचा गौरव

विद्यापीठातील गुणवंत शिक्षक : प्रा. (डॉ.) श्रीकृष्ण महाजन. विद्यापीठातील गुणवंत सेवक : स्वाती खराडे, फिरोज नायकवडी, अजय आयरेकर, बबन चौगले. संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य : डॉ. मोहन राजमाने, एस. जी. एम. कॉलेज, कराड, डॉ. रमेश कुंभार, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. महाविद्यालयीन गुणवंत सेवक : जयंतराव कदम, कनिष्ठ लेखनिक, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस, जि. सांगली, विजयकुमार लाड, ग्रंथालय परिचर, शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर. बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार : डॉ. अनिलकुमार वावरे (छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा). प्राचार्य सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका : डॉ. तेजस्विनी दीपक पाटील-डांगे (आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, कासेगाव, जि. सांगली). याशिवाय राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता विद्यार्थी सौरभ संजय पाटील आणि कुलपती सुवर्णपदक विजेती विद्यार्थिनी महेश्वरी धनंजय गोळे.

### वनस्पतीशास्त्र, अर्थशास्त्र अधिविभागांना उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार प्रदान

शिवाजी विद्यापीठाने २०१९ पासून उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार देण्यास सुरुवात केली. संबंधित विभागास पारितोषिकापोटी दहा लाख रुपये, प्रमाणपत्र व छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा प्रदान करण्यात येतो. यंदा उत्कृष्ट अधिविभागासाठीचा हा पुरस्कार विज्ञान व तंत्रज्ञान गटात वनस्पतीशास्त्र अधिविभागास तर अन्य अधिविभागांतून अर्थशास्त्र अधिविभागाला देण्यात आला.

19 NOV 2021
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक उपक्रम अनुकरणीय

## डॉ. मृणालिनी फडणवीस; शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा वर्धापन दिन उत्साहात

**कोल्हापूर, ता. १८ :** 'शिवाजी विद्यापीठाने सामाजिक दायित्वाच्या भावनेतून राबविलेले उपक्रम अनुकरणीय आहेत,' असे मत सोलापूर येथील अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापन दिन समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. या वेळी गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. महाजन, बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे यांना, तर प्राचार्य सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार कासेगाव (जि. सांगली) येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या डॉ. तेजस्विनी दीपक पाटील-डांगे यांना देण्यात आला. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

दि न्यू कॉलेज व भोगावती महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार झाला. उत्कृष्ट अधिविभागासाठी वनस्पतीशास्त्र अधिविभागाला, तर अन्य अधिविभागांतून अर्थशास्त्र अधिविभागाला दिला. राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता विद्यार्थी सौरभ संजय पाटील, कुलपती सुवर्णपदक विजेती विद्यार्थिनी महेश्वरी धनंजय गोळे यांचाही गौरव करण्यात केला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील व सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गुणवंत सेवक पुरस्कार स्वीकारताना बबन चौगले. शेजारी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.**

### विविध पुरस्कार विजेते

गुणवंत सेवक : स्वाती खराडे (सीनिअर सिस्टीम ॲनालिस्ट), फिरोज नायकवडी (सहायक अधीक्षक), अजय ऊर्फ आप्पासाहेब आयरेकर (कनिष्ठ सहायक) बबन चौगले (प्रयोगशाळा परिचर). महाविद्यालय गुणवंत प्राचार्य : डॉ. मोहन राजमाने (एस. जी. एम. कॉलेज, कराड), डॉ. रमेश कुंभार (विवेकानंद कॉलेज), गुणवंत सेवक : जयंतराव कदम (कनिष्ठ लेखनिक, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस, जि. सांगली), विजयकुमार लाड (ग्रंथालय परिचर, शहाजी छत्रपती महाविद्यालय), बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार : डॉ. अनिलकुमार वावरे (छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा), प्राचार्य सुमतीबाई पाटील आदर्श शिक्षिका :डॉ. तेजस्विनी पाटील-डांगे (आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, कासेगाव, जि. सांगली).

19 NOV 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची प्रगती नेत्रदीपक

- सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांचे गौरवोद्‌गार
- शिवाजी विद्यापीठाचा ५९ व्या वर्धापन विविध कार्यक्रमांनी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने 'नॅक'चे 'ए प्लस प्लस' मानांकनासह देशविदेशांतील शैक्षणिक व संशोधकीय स्वरुपाचे अनेक शिखरे सर केली आहेत. विद्यापीठाची ही घोडदौड गौरवास्पद आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाने सामाजिक दायित्वाच्या भावनेतून राबविलेले उपक्रम सुद्धा अनुकरणीय आहेत. शंभर वर्षांहून अधिक काळाचा वारसा असलेल्या विद्यापीठांच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठाने अवघ्या ५९ वर्षांत साधलेली प्रगती नेत्रदीपक आहे, असे गौरवोद्‌गार सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापन दिन समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. प्र–कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. फडणवीस म्हणाल्या, उच्चशिक्षण क्षेत्रात कार्यरत लोकांनी, विशेषतः शिक्षकांनी उच्चशैक्षणिक वारसा वृद्धिंगत करण्याची जबाबदारी स्वीकारायला हवी. विद्यार्थ्यांचा कल समजून घेऊन योग्य मार्गदर्शन पालकांसह शिक्षकांनी करावे. उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी मनःशांतीही तितकीच महत्त्वाची आहे. हे कोरोनाने दाखवून दिले आहे. आरोग्याच्या संदर्भात केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिक सुदृढतेलाही बरोबरीचे स्थान आहे. तसेच शिक्षणाच्या संदर्भात दर्जावृद्धी महत्त्वाची मानली आहे. निसर्ग व पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही शिक्षण क्षेत्राने घ्यायला हवी.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापन दिनी गुणवंत कर्मचारी पुरस्कार स्वीकारताना विद्यापीठ सेवक अजय आयरेकर.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, माहिती तंत्रज्ञान व तत्संबंधी संशोधन विकासावर 'इंडस्ट्री–४.०" खूप वेगाने विस्तारत आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण घेण्यास सुसज्ज करण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाच्या दृष्टीने विद्यापीठात विविध सेवांचे ऑटोमेशन करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. काही सेवा कार्यान्वितही झाल्याचे सांगितले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अभय जायभाये, अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. नमिता खोत, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड आदी उपस्थित होते.

**विविध पुरस्कार** - विद्यापीठातील गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. एस.एस. महाजन यांना देण्यात आला. बॅ. पी.जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे यांना, तर कै. प्राचार्य श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार कासेगाव (जि. सांगली) येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या डॉ. तेजस्विनी दीपक पाटील-डांगे यांना प्रदान करण्यात आला.विद्यापीठातील गुणवंत सेवक स्वाती खराडे, फिरोज नॉयकवडी, अजय आयरेकर, बबन चौगले. महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्यः कराड येथील एस. जी. एम. कॉलेजचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने, विवेकानंद कॉलेजचे डॉ. रमेश कुंभार. तसेच विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांचाही सन्मान करण्यात आला.

लोकमत

# निवडणूक प्रक्रियेचा अभ्यासक्रमात समावेश करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकशाही प्रक्रियेत युवकांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे, त्यादृष्टीने महाविद्यालये व विद्यापीठांचे सहकार्य अपेक्षित आहे. त्यासाठी अभ्यासक्रमात लोकशाही आणि सुशासन, निवडणूक प्रक्रिया या विषयावर अभ्यासक्रम राबवावेत, अशी सूचना मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी मंगळवारी केली.

शिवाजी विद्यापीठाला सदिच्छा भेट दिल्यानंतर त्यांनी प्रमुख अधिकारी व प्राचार्य यांच्यासोबत चर्चा केली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल रेखावार, प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

देशपांडे म्हणाले, मतदार जागृती व नोंदणी यापलीकडे जाऊन लोकशाही प्रक्रियेचा भविष्यवेधी विचार करण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी लोकशाही प्रक्रियेतील सजग घटक म्हणून आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी सिद्ध व्हावे.

पुढारी

# 'महिलांसाठी सूक्ष्म उद्योजकता संधी' विषयावर आज परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ शुक्रवार (दि. १९) रोजी सकाळी १० ते १ या वेळेत मानव्यशास्त्र इमारत येथे 'महिलांसाठी सूक्ष्म उद्योजकता संधी' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. अपर्णा राव, आय.आय.टी. मुंबई व प्रसाद कुलकर्णी, संस्थापक - शेफ फाऊंडेशन, नागपूर हे मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
19 NOV 202[illegible] पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालये, विद्यापीठातील वसतिगृहे आठ दिवसांत सुरू : ना. उदय सामंत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील वसतिगृहे सुरू करण्याबाबत डॉ. धनराज माने व डॉ. अभय वाघ यांची समिती नेमली आहे. त्यांनी सर्व विद्यापीठांचा आढावा घेतला आहे. येत्या आठ दिवसांत वसतिगृहे सुरू होतील, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी दिली.

कोल्हापूर दौऱ्यावर असताना ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. मंत्री सामंत म्हणाले, प्राध्यापक भरती प्रक्रियेचा २०८८ पदांचा पहिला टप्पा सुरू झाला आहे. तीन हजारांहून अधिक पद भरतीची मागणी केली होती. दुसऱ्या टप्प्यात एक हजार प्राध्यापकांची पदे भरली जाणार आहेत. त्यामुळे पात्र उमेदवारांनी नाराज होऊ नये. 'सीएचबी' प्राध्यापकांना चांगले पान २ वर »

# महाविद्यालये, विद्यापीठातील वसतिगृहे आठ दिवसांत सुरू : ना. उदय सामंत

(पान १ वरून) वेतन कसे देता येईल, यासाठी समिती नियुक्त केली आहे. लवकरच 'सीएचबी' प्राध्यापकांच्या मागण्या पूर्ण करण्याचा निर्णय घेतला जाईल. पन्हाळ्यासह इतर किल्ल्यांवर युवक-युवतींनी नावे कोरल्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर बोलताना मंत्री सामंत म्हणाले, गडकिल्ल्यांचा इतिहास नव्या पिढीसमोर पोहोचणे काळाची गरज आहे. गडकिल्ल्यांची निगा राखली पाहिजे. याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना करणार आहे.

**एसटी कर्मचाऱ्यांनी टोकाची भूमिका घेऊ नये**

संपकरी एसटी कर्मचाऱ्यांनी टोकाची भूमिका न घेता चर्चेसाठी आले पाहिजे. यातून मार्ग निघू शकतो. एसटी कर्मचाऱ्यांच्या पाठीशी महाविकास आघाडीचे सरकार शंभर टक्के उभे आहे. आंदोलनामुळे जनसामान्यांचे हाल होत आहेत, याचे भान कर्मचाऱ्यांनी ठेवले पाहिजे, असेही ते म्हणाले.

कोल्हापूर विधान परिषदेसाठी विरोधी पक्षाकडे किती तगडा उमेदवार आहे हे माहीत नाही. मात्र महाविकास आघाडीचे सतेज पाटील हे तगडे उमेदवार असून त्यांचा विजय निश्चित असल्याचे मंत्री सामंत म्हणाले.

**विद्यार्थ्यांकडून जादा फी घेणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई**

महाविद्यालये जादा फी घेत असतील तर विद्यार्थ्यांनी तक्रार विद्यापीठाकडे करावी. विद्यापीठांनी याबाबतची लेखी तक्रार उच्चशिक्षण विभागाकडे करावी. दोषी आढळल्यास संबंधित महाविद्यालयावर कारवाई केली जाईल, असा इशारा मंत्री सामंत यांनी दिला.

**विद्यापीठ सुवर्ण महोत्सव निधीबाबत लवकरच आढावा बैठक**

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त राज्य सरकारने ५० कोटी रुपयांचा निधी जाहीर केला होता. त्यामधील ३ कोटी रुपये मिळाले आहेत. विद्यापीठाचे हीरक महोत्सवी वर्ष सुरू झाले तरी उर्वरित निधी मिळालेला नाही, हे निदर्शनास आणून देताच याबाबत दोन दिवसांत विद्यापीठ प्रशासनासमवेत आढावा बैठक घेणार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री सामंत यांनी सांगितले.

सकाळ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रातर्फे विविध अभ्यासक्रम

**आर. के. नगर :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे 'पी. जी. डिप्लोमा इन डॉ. बी. आर. आंबेडकर थॉट' आणि 'सर्टिफिकेट कोर्स इन इंडियन कॉन्स्टीट्यूशन' या अभ्यासक्रमासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत प्रवेश सुरू झाले आहेत. सर्व विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे. 'पी. जी. डिप्लोमा इन डॉ. बी. आर. आंबेडकर थॉट' अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्ष आहे. या अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण असणे गरजेचे आहे. 'सर्टिफिकेट कोर्स इन इंडियन कॉन्स्टीट्यूशन' अभ्यासक्रमाचा कालावधी सहा महिने आहे. या अभ्यासक्रमासाठी दहावी उत्तीर्ण असणे गरजेचे आहे.

तरुण भारत

# डॉ. आंबेडकर संशोधन केंद्रांतर्गत प्रमाणपत्र अभ्यासक्रमास प्रवेश सुरु

- डिप्लोमा इन डॉ. बी. आर. आंबेडकर थॉट
- सर्टिफिकेट कोर्स इन इंडियन कॉन्स्टीट्युशन अभ्यासक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने पदव्युत्तर डिप्लोमा इन डॉ. बी. आर. आंबेडकर थॉट आणि सर्टिफिकेट कोर्स इन इंडियन कॉन्स्टीटयुशन अभ्यासक्रम प्रवेशाला सुरूवात झाली आहे. ३० नोव्हेंबरपर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार आहे. डिप्लोमा इन डॉ. बी. आर. आंबेडकर थॉट अभ्यासक्रमाचा कालावधी १ वर्षे आहे. त्यासाठी कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण असणे गरजेचे आहे सर्टिफिकेट कोर्स इन इंडियन कॉन्स्टीटयुशनचा कालावधी ६ महिने आहे. यासाठी दहावी उत्तीर्ण गरजेचे आहे. तरी, इच्छुकांनी प्रवेश निश्चित करून लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्र संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.